**CNR No : MHAH-1900-1014-2024**

दाखल तारीख - २९.०७.२०२४.
नोंदणी तारीख - २९.०७.२०२४.
निकाल तारीख - ०४.०४.२०२६.
कालावधी - **०१व. ०८म. ०६दि.**

| |
|---|
| **शेवगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.३, शेवगाव** |
| **( पिठासीन अधिकारी – डी.आर. कुलकर्णी )** |
| **नियमीत फौजदारी खटला क्र.१५६/२०२४** **नि. क्र.४२** |
| गुन्हा नोंद क्रः ३६८/२०२४............... पोलीस स्टेशन, शेवगाव |

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे, शेवगाव ता. – शेवगाव, जि. – अहमदनगर. |
| **अभियोगपक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्रीमती पी.आर.गिते |
| **आरोपी** | | **१. निलेश आबासाहेब वामन,**<br>वय – ४४ वर्षे,<br>**२. अभिषेक निलेश वामन,**<br>वय– २४ वर्षे,<br>**३. पंकज निलेश वामन,**<br>वय – २२ वर्षे,<br>**४. मनिषा निलेश वामन,**<br>वय – ४१ वर्षे,<br>सर्व रा. आपेगाव, ता. शेवगाव,जि. अहमदनगर |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. एस.यु.लांडे. |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २२.०४.२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २३.०४.२०२४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २९.०७.२०२४ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :- | २८.०३.२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०७.०४.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | :- | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०४.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात राखुन ठेवलेला आदेश | :- | आरोपींची निर्दोष मुक्तता. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.४२८ अन्वये समायोजीत (**set off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **निलेश आबासाहेब वामन,** | समजपत्रावर सोडण्यात आले. | २८.०३.२०२५ | भा.दं.वि. कमल ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २ | **अभिषेक निलेश वामन,** | समजपत्रावर सोडण्यात आले. | २८.०३.२०२५ | भा.दं.वि. कमल ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३ | **पंकज निलेश वामन,** | समजपत्रावर सोडण्यात आले. | २८.०३.२०२५ | भा.दं.वि. कमल ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ४ | **मनिषा निलेश वामन** | समजपत्रावर सोडण्यात आले. | २८.०३.२०२५ | भा.दं.वि. कमल ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग – क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र.४४ (ii) अन्वये)**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार</u>**

| **सा.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **स्वरूप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १ | सुनिता संजय वामन | फिर्यादी | नि.क्र.३१ |
| २ | सुरेश संजय वामन | जखमी साक्षीदार | नि.क्र.३२ |
| ३ | नंदकुमार हिरामन निकरट | जखमी साक्षीदार | नि.क्र.३६ |

**<u>बचाव पक्षातर्फे साक्षीदार /न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार /अभियोगपक्षामार्फत निशाणी</u>**

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>आरोपीतर्फे कबुल कागदपत्रे</u>**

| **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|
| नि.क्र.३७ | घटनास्थळ पंचनामा |

**<u>न्यायालयामार्फत निशाणी देण्यात आलेली कागदपत्रे</u>**

| **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|
| निरंक | निरंक |

**<u>मुद्देमालाचे वर्णन</u>**

| **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|
| -- | एक लाकडी काठी |

**<u>न्यायनिर्णय</u>**

( घोषित दिनांक ०४.०४.२०२६ )

आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला आहे.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की</u>,** :

२) दि. २४.०४.२०२४ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी, तिची मुलगी शितल, तिचे जावई नंदकुमार, तिचा भाऊ विठ्ठल आणि भाऊजई वनिता असे सर्व फिर्यादीच्या घरासमोर असतांना तेथे आरोपी क्र.१ निलेश, आरोपी क्र.२ अभिषेक आरोपी क्र.३ पंकज व आरोपी क्र.४ मनिषा आले व फिर्यादीस म्हणाले की, तुमचा आणि सामाईक विहीरीचा काहीएक संबंध नाही असे म्हणुन आरोपी क्र.४ मनिषा हिने लाकडी काठीने फिर्यादीच्या उजव्या पायावर मारहाण केली व त्यावेळी फिर्यादीचा मुलगा सुरेश हा मध्ये सोडविण्यास आला असता त्याला सुध्दा आरोपी क्र.२ निलेश, आरोपी क्र.३ अभिषेक व आरोपी क्र.४ पंकज यांनी लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच तुमचे कोयत्याने हातपाय तोडुन टाकु अशी धमकी दिली त्यावेळी त्यांचे भांडणे फिर्यादीची मुलगी शितल, जावई नंदकुमार, भाऊ विठ्ठल आणि भावजई वनिता यांनी सोडविले. म्हणुन फिर्यादीने शेवगाव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

३) पोलिस ठाणे, ता.शेवगाव यांनी सदरची फिर्याद गु.र.नं.३६८/२०२४ भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये नोंदवली आणि पुढील तपासकामी पो.ना./१५३ एस.व्ही.आव्हाड यांचेकडे दिली. त्यांनी तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४) आरोपींविरूध्द नि.क्र.१५ वर भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये आरोप ठेवले. त्यातील मजकूर आरोपींना त्यांचे भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व खटला चालवण्याची मागणी केली.

५) अभियोग पक्षातर्फे एकुण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. आरोपींचा नि.क्र.३८ ते ४१ वर फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला.

६) अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.आर.गिते आणि आरोपीतर्फे ॲड. श्री. एस.यु.लांडे यांचा युक्तिवाद ऐकला.

७) खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले, कारणांसह त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे :–

| अ.नं. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. २२.०४.२०२४ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर मौजे आखातवाडे, ता.शेवगाव येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| २. | वर नमुद वेळ, ठिकाण व दिनांक रोजी आरोपींनी | नकारार्थी |

| अ.नं. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| | आपसात संगनमत करुन फिर्यादीस व साक्षीदारास लाथाबुक्याने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | |
| ३. | वर नमुद वेळ, ठिकाण व दिनांक रोजी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस व साक्षीदारास शिवीगाळ करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांतता भंग होईल असे त्यांना प्रक्षोभित केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| ४. | वर नमुद वेळ, ठिकाण व दिनांक रोजी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस व साक्षीदारास जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी पात्र धाकदपटशा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

८)　अभियोग पक्षाने आरोपींविरूध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ फिर्यादी सुनिता संजय वामन यांना नि.क्र.३१ वर, जखमी साक्षदार क्र.२ सुरेश संजय वामन यांना नि.क्र.३२ वर व साक्षीदार क्र.३ नंदकुमार हिरामन निकरट यांना नि.क्र.३६ वर

तपासले आहे. आरोपी व फिर्यादी दरम्यान तडजोड झाल्याबाबत नि.क्र.३० प्रमाणे पुरसीस दाखल करण्यात आली. तसेच आरोपींनी नि.क्र.३७ वरील घटनास्थळ पंचनामा मान्य केलेला आहे. मुळ फिर्यादीने नि.क्र.३३ वर पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करिता</u> :-**

९) अभियोग पक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाकडी काठीने मारुन साक्षीदार क्र. २ व ३ यांना लाथाबुक्याने मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक दुःखापत पोहचवली व त्यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली.

१०) आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभीयोग पक्षाने फिर्यादी/जखमी साक्षीदार सुनिता संजय वामन यांची साक्षीदार क्र.१ म्हणुन साक्ष नोंदवली आहे. साक्षीदार क्र.१ सुनिता ही फिर्यादी व जखमी साक्षीदार असल्याने सदर साक्षीदाराचा पुरावा अभीयोग पक्षाकरीता अत्यंत महत्तवाचा आहे. परंतु सदर साक्षीदाराने तिच्या साक्षीमध्ये तिचे व आरोपी दरम्यान किरकोळ वाद झाला असल्याचे कथन करुन त्या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच सदर साक्षीदाराने रागाच्या भरात आरोपींविरुध्द फिर्याद दिली असे कथन केलेले आहे. साक्षीदार क्र.१/फिर्यादी हिने अभीयोग पक्षास सहाय्य केले नसल्याने अभीयोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी

वकीलांनी उलट तपास नोंदवला परंतु सदर उलटतपासामध्ये देखील आरोपी क्र.४ हिने तिला काठीने उजव्या पायावर मारल्याचे व तिला व तिच्या मुलास लाथाबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. सदर साक्षीदाराच्या उलटतपासामधुन देखील अभीयोग पक्षास सहाय्य होईल असे काही अभीलेखावर आले नाही.

११) अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.२ सुरेश संजय वामन व साक्षीदार क्र.३ नंदकुमार हिरामन निकरट यांची साक्ष नोंदवली आहे. साक्षीदार क्र.२ व ३ हे देखील अभियोग पक्षाच्या तथ्याप्रमाणे जखमी साक्षीदार आहेत. परंतु सदर साक्षीदारांनी देखील त्यांच्या पुराव्या दरम्यान आरोपी व त्यांच्यादरम्यान किरकोळ वाद झाला होता व त्या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे कथन केलेले आहे. साक्षीदार क्र.२ व ३ यांनी अभीयोग पक्षास सहाय्य केले नसल्याने अभीयोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकीलांनी उलट तपास नोंदवला परंतु सदर उलटतपासामधुन देखील अभीयोग पक्षास सहाय्य होईल असे काही अभीलेखावर आले नाही.

१२) फिर्यादी/साक्षीदार क्र.१ आणि साक्षीदार क्र.२ व ३ हे जखमी साक्षीदार असुन देखील त्यांनी आरोपींविरुध्द काहीही कथन केलेले नाही. अभियोग पक्षातर्फे नोंदवण्यात आलेल्या उलटतपासामध्ये देखील अभियोग पक्षास सहाय्य होईल असे काहीही अभिलेखावर आलेले नाही. आरोपींनी साक्षीदार क्र.१ यास लाकडी काठीने मारहाण

करुन साक्षीदार क्र. २ व ३ यांना शिवीगाळ केली व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली याबाबत सदर साक्षीदारांनी काहीही कथन केलेले नाही. सदर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यामध्ये घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही.

१३) अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यातुन सदर घटनेचा आरोपींशी कोणताही संबंध प्रस्थापीत होत नाही. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने ईतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. प्रस्तुत प्रकरणात आरोपी व फिर्यादीदरम्यान तडजोड झाल्याबाबत पुरसीस दाखल केल्याचे दिसुन येते. यावरुन आरोपी व फिर्यादी दरम्यान तडजोड झाल्यामुळे फिर्यादी व साक्षीदार क्र.२ व ३ हे घटनेबाबत काही एक कथन करण्यास इच्छुक नसल्याचे दिसुन येते. आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीस लाकडी काठीने मारहाण करुन साक्षीदार क्र. २ व ३ यांना लाथाबुक्याने मारुन जखमी करुन इच्छापुर्वक दुःखापत पोहचवली व त्यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली याबाबत अभीलेखावर काहीही पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ खालील आरोप अभियोग पक्षाने निःसंशयपणे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ४ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करीता</u>** :-

१४) वर नमूद चर्चेवरुन व सदर प्रकरणात दाखल पुराव्यावरुन स्पष्ट होते की,

आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहीता कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ खालील आरोप अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. त्यामुळे आरोपी हे सदर आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१. निलेश आबासाहेब वामन, २. अभिषेक निलेश वामन, ३. पंकज निलेश वामन व ४.मनिषा निलेश वामन यांची भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ खालील आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | जप्त मुद्देमाल एक लाकडी काठी याची अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावावी. |
| ४. | आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- रुपयांचा जामीन द्यावा. |
| ५. | न्यायनिर्णय न्यायालयात घोषित करण्यात आला. |

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.04.04 18:01:17 +0530

ठिकाणः शेवागाव (डी. आर. कुलकर्णी)

दि.०४.०४.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.३ शेवगाव.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, याची पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एस. ए. चोपणे |
| न्यायालयाचे नाव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, शेवगांव |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०४.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०४.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०४.०४.२०२६ |